महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

---

## नागपूर मेट्रो शेअर ऑटो रिक्षा सेवेचे औपचारिक उदघाटन



नागपूर : महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन तर्फे मेट्रो स्टेशनपर्यंत आणि मेट्रो स्टेशनपासून गंतव्य स्थानापर्यंत (फर्स्ट माईल आणि लास्ट माईल कनेक्टिविटी) प्रवाशांना पोहचवण्यासाठी शेयर ऑटोरिक्षा सेवेचे आज कस्तुरचंद पार्क मेट्रो स्टेशन येथून औपचारिक उदघाटन करण्यात आले.

महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री श्रावण हर्डीकर, संचालक (स्ट्रॅटेजिक प्लांनिंग) श्री अनिल कोकाटे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी (शहर) श्री हर्षल डाके, नागपूर ऑटो संघटनेचे अध्यक्ष श्री तायवाडे, महा मेट्रोचे इतर अधिकारी तसेच ऑटो संघटनेचे पदाधिकार्यांनी हिरवा झेंडा दाखवत हि सेवा सुरु केली.

यासंबंधी शेयर ऑटो सेवेची हि संकल्पना अनोखी असून टप्प्या-टप्प्याने हि सेवा नागपूर मेट्रोच्या अन्य स्थानकांवरून सुरु होणार आहे. शेयर ऑटोरिक्षा सेवेचे दर निश्चित असून Regional Transport Authority ने ते दर मंजूर केले आहेत. ही संकल्पना केवळ मेट्रोने प्रवास करणे सोपे करणार नाही, तर नागपूरकरांसाठी एक मोठा गेम चेंजर ठरेल कारण ती फीडर सेवा प्रदान करून आवश्यक ठिकाणे जोडेल. सुरुवातीला निवडक स्थानकांवर आणि मुख्य वेळेतील प्रवासासाठी उपलब्ध होईल.या पथदर्शी प्रकल्पाचे परिणाम विचारात घेऊन पुढे इतर स्थानकांवर ते कार्यान्वित केले जातील.

शहरातील विविध ऑटो रिक्षा संघटनांशी सल्ला-मसलत करून हि सेवा सुरु झाली आहे. नागपूरकरांकरता हि सेवा अतिशय लाभदायक ठरणार असून टप्प्या-टप्प्याने हि सेवा शहरात इतरत्र सुरु होणार असल्याचे महा मेट्रोचे व्यवथापकीय संचालक श्री श्रावण हर्डीकर यांनी सांगितले. हि सेवा सुरु करण्याकरता प्रादेशिक परिवहन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर पोलीस वाहतूक शाखा आणि ऑटो रिक्षा संघटनांनी मोलाची मदत केली. महा मेट्रो तर्फे महा व्यवस्थापक (ऑपरेशन अँड मेंटेनन्स) श्री सुधाकर उराडे आणि इतर अधिकारी उपस्थित होते. सेवा सुरू झाल्यावर याचा लाभ कस्तुरचंद पार्क स्टेशन येथून बाहेर पडलेल्या प्रवाश्यांनी घेतला.